हुतात्मा स्मारक समिती, आष्टी द्वारा संचालित

व

रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नीत

# हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय, आष्टी (शहिद), जि. वर्धा


फोन नं. (07156) 225817

Email : hascashti@gmail.com

Website: hutatmaasc.org


**नॅक द्वारा B + श्रेणी प्राप्त**

**(स्थापना - जुलै १९९०)**

# माहिती पत्रक

## २०२४-२०२५



शहीदों के मजारों पर लगेंगे हर बरस मेले ।
वतन पे मरने वालों का बाकी यही निशां होगा।।

।। हुतात्म्यांचे समर्पण झाले जिथे । ज्ञानाच्या ज्योती तेववितो तिथे ।।

हुतात्मा स्मारक समिती, आष्टी द्वारा संचालित

व

रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर संलग्नीत

# हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय, आष्टी (शहीद), जि. वर्धा

नॅक द्वारा B + श्रेणी प्राप्त

Ph.No. (07156) 225817 Mob.No. 9119480041

Email : hascashti@gmail.com

Website : www.hutatmaasc.org

# माहिती पत्रक

## २०२४-२०२५

मूल्य रु. ५०/-

प्रकाशक

प्राचार्य,

हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय

आष्टी, जि. वर्धा

मो.नं. ९११९४८००४१



## प्राचार्या डॉ. कु. सरीता एस. निमगरे

### * मनोगत *

हुतात्मा स्मारक समिती, आष्टी, जि. वर्धा अंतर्गत हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना २१ जुलै १९९० रोजी करण्यात आली. त्यामुळे आष्टी व ग्रामीण परिसरातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सुविधा निर्माण झाली.

महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व व सर्वांगिण विकास व्हावा या दृष्टिकोनातून अथक परिश्रम घेतले जातात. महाविद्यालयाला लाभलेले उच्चविद्याविभूषित व अनुभवी प्राध्यापक वृंद विद्यार्थी घडविण्यासाठी उपयुक्त ठरले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून समाजासाठी विविध उपक्रम राबविल्या जातात.

शहीदांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्थापन झालेले परिसरातील आमचे एकमेव महाविद्यालय असून राष्ट्राच्या विकासात एक उमदे व्यक्तीमत्त्व तयार करणे हा आमच्या शिक्षण संस्थेचा मुख्य उद्देश आहे.

आष्टी परिसरातील जनता, पालक व विद्यार्थ्यांच्या सहकार्याने महाविद्यालयाची प्रगती करणे हा आमचा मानस आहे.

प्राचार्य
हुतात्मा राष्ट्रीय कला व विज्ञान महाविद्यालय,
आष्टी, जि. वर्धा

# ※ अनुक्रमणिका ※


| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | महाविद्यालयाची उद्दीष्टे | ... | ... | ०१ |
| २) | अभ्यासक्रम व विषय | ... | ... | ०२ |
| ३) | प्रवेश पात्रता | ... | ... | ०४ |
| ४) | प्रवेशासंबंधी नियम | ... | ... | ०५ |
| ५) | प्रवेशाकरीता मागासवर्गीयांकरीता आरक्षित जागा<br>आवेदनपत्रासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे | ... | ... | ०६ |
| ६) | विविध शुल्कासंबंधी माहीती | ... | ... | ०७ |
| ७) | शुल्क निधीबाबतच्या विशेष सूचना | ... | ... | ०८ |
| ८) | शिष्यवृत्त्या व फी सवलती | ... | ... | ०९ |
| ९) | उपस्थिती संबंधी नियम,<br>ओळखपत्र, नामांकन अर्ज | ... | ... | १० |
| १०) | शिस्तपालना संबंधीचे नियम | ... | ... | ११ |
| ११) | ग्रंथालयाविषयी नियमावली | ... | ... | १३ |
| १२) | शारीरिक शिक्षण विभागाविषयी माहीती | ... | ... | १४ |
| १३) | महाविद्यालयीन उपक्रम तथा विविध योजना<br>१) राष्ट्रीय सेवा योजना २) विद्यार्थी परिषद<br>३) सांस्कृतिक व अभ्यासेतर कार्यक्रम ४) सहली ५) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजना<br>६) विद्यापीठ प्रमाणपत्र अभ्यासक्रम ७) करिअर कट्टा | ... | ... | १६ |
| १४) | प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी | ... | ... | १८ |
| १५) | महाविद्यालयीन विविध समित्या | ... | ... | २० |
| १६) | अतिरिक्त कार्यभार प्रमुख | ... | ... | २४ |
| १७) | प्रवेश समिती २०२४-२०२५ | ... | ... | २५ |
| १८) | पारितोषिके | ... | ... | २६ |
| १९) | विद्यापीठ गीत | ... | ... | २९ |
| २०) | पसायदान | ... | ... | ३० |

## व्यवस्थापक मंडळ

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. भरतजी लि. वणझारा | अध्यक्ष |
| २. | डॉ. श्री. किशोर रा. गंजिवाले | उपाध्यक्ष |
| ३. | श्री. विनायक मा. होले | सचिव |
| ४. | श्री. शंकरराव म. कोल्हे | सहसचिव |
| ५. | श्री. राजकुमार भा. सव्वालाखे | कोषाध्यक्ष |
| ६. | श्री. शंकरराव ना. नागपूरे | सदस्य |
| ७. | श्री. अर्पित अ. मालपे | सदस्य |

## महाविद्यालयीन विकास समिती
### (College Development Committee)

| अ.क्र. | नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. भरतजी लि. वणझारा | पदसिद्ध अध्यक्ष |
| २. | डॉ. कु. सरीता सं. निमगरे | सचिव (प्राचार्या) |
| ३. | श्री. विनायक मा. होले | सदस्य |
| ४. | प्रा. श्री. विनायक श्री. पारे | सदस्य (शिक्षण) |
| ५. | श्री. राजेंद्र रा. शेटे | सदस्य (माजी विद्यार्थी) |
| ६. | श्री. अनिरुद्ध पाटील | सदस्य (समाजसेवा) |
| ७. | प्रा. आर.एल. गुल्हाने | शिक्षक सदस्य (IQAC समन्वयक) |
| ८. | प्रा. श्री. एन. जी. सोनुले | सदस्य (नामनिर्देशित विभाग प्रमुख) |
| ९ | प्रा. डॉ. व्हि. आर. चिंचमलातपुरे | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| १०. | प्रा. डॉ. पी. डब्ल्यु. धनविज | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| ११. | प्रा. डॉ. कु. यु. डब्ल्यु. फुले | सदस्य (शिक्षक प्रतिनिधी) |
| १२. | श्रीमती नलिनी गो. इजापुरे | सदस्य (शिक्षकेत्तर प्रतिनिधी) |
| १३. | रिक्त | अध्यक्ष (विद्यार्थी परीषद) |
| १४. | रिक्त | सचिव (विद्यार्थी परीषद) |
| १५ | श्री. रुपराव रा. पवार | विशेष निमंत्रित |

# महाविद्यालयाची उद्दीष्ट्ये

''विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तीमत्व विकास हे महाविद्यालयाचे मुख्य उद्दिष्ट आहे.''

१) ''शाश्वत सत्य आणता येणं
योग्य-अयोग्य ओळखणं
शिक्षणाने सौंदर्य टिपता येणं
अन् संस्कृतीची गोडी चाखणं
साऱ्या जगानं व्हावं डौलदार अन् शहाणं
त्यासाठी देवू आम्ही आमचे योगदानं''

संस्थेच्या या ध्येय धोरणाप्रती समर्पित होवून कार्य करणे.

२) विद्यापीठस्तरीय उच्च शिक्षण घेवू इच्छिणाऱ्या ग्रामीण भागातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण सुविधा उपलब्ध करुन देणे.

३) विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांच्या विकासाच्या दृष्टीने विविध योजना व उपक्रम तयार करुन राबविणे.

४) विद्यार्थ्यांमध्ये सेवाभाव, राष्ट्रप्रेम, सर्वधर्मसमभाव वाढविणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिकदृष्टी निर्माण करुन तंत्र शिक्षणाची आवड निर्माण करणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये संगणकशास्त्र, माहिती तंत्रज्ञान आणि जैवतंत्रज्ञान आवड निर्माण करणे.

७) मजबुत राष्ट्राची उभारणी करिता स्वयंपूर्ण व सक्षम विद्यार्थी तयार करणे.

८) पुस्तकी ज्ञानासोबतच प्रात्यक्षिक घटकांच्या माध्यमाने विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.

९) पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे.

१०) विद्यार्थ्यांचा सर्वांगिण व्यक्तीमत्त्व विकास साध्य करणे.

# अभ्यासक्रम व विषय
## (Courses & Subjects)

महाविद्यालयात खालील अभ्यासक्रम व विषय शिकविले जातात.

## कला शाखा

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर नुसार कला शाखेतील बी.ए. भाग १ ला सत्र २०१६–१७ पासुन, बी.ए. भाग २ ला सत्र २०१७–१८ पासुन व बी.ए. भाग ३ ला सत्र २०१८–१९ पासुन सेमिस्टर पॅटर्न लागू करण्यात आलेला आहे.

**तसेच रा.तु.म.ना.वि./विद्या/२४/१८७ दि. १७ मे २०२४ नुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP-2020 सत्र २०२४–२५ पासून लागू करण्यात येत आहे.**

कला शाखेत बी.ए. भाग १ ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील विषयामधून **Major and Minor** विषयाची निवड करावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. मराठी<br>Marathi | २. इंग्रजी<br>English | ३. भूगोल<br>Geography | ४. राज्यशास्त्र<br>Political Sci. | ५. अर्थशास्त्र<br>Economics |
| ६. मराठी साहित्य (MLT)<br>Marathi Lit. | | ७. इंग्रजी साहित्य (ELT)<br>English Lit. | | ८. गृह–अर्थशास्त्र<br>Home Economics |

## विज्ञान शाखा

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर यांचे पत्र क्र. **N/29 dt. 05/03/2013** नुसार विज्ञान शाखेतील बी.एस्सी. भाग १ ला सत्र २०१३-१४ पासुन, बी.एस्सी. भाग २ ला सत्र २०१४-१५ पासुन व बी.एस्सी. भाग ३ ला सत्र २०१५-१६ पासुन सेमिस्टर पॅटर्न लागू करण्यात आलेला आहे.

**तसेच रा.तु.म.ना.वि./विद्या/२४/१८७ दि. १७ मे २०२४ नुसार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण NEP-2020 सत्र २०२४-२५ पासून लागू करण्यात येत आहे.**

विज्ञान शाखेत बी.एसी. भाग १ ला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी खालील विषयामधून **Major and Minor** विषयाची निवड करावी.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. मराठी<br>Marathi | २. इंग्रजी<br>English | ३. भौतिकशास्त्र<br>Physics | ४. गणित<br>Maths | ५. रसायनशास्त्र<br>Chemistry |
| ६. संगणकशास्त्र<br>Computer Sci. | ७. प्राणीशास्त्र<br>Zoology | ८. वनस्पतीशास्त्र<br>Botany | | |

**या विषयाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना Vocational Skill Course, Skill Development Course, Ability Enhancement Course, Indian Knowledge System Course, Value Education Course, Co-curricular Course, & Field Project / On the Job Training / Community Engagement Project / Research Project हे ऐच्छिक विषय घेऊन आपली गुणवत्ता वाढविण्याची मुभा राहिल.**

# प्रवेश पात्रता
## (Eligibility for Admission)

## कला शाखा

**प्रथम वर्ष बी.ए. :**

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची १२ वी (H.S.C.) किंवा M.C.V.C. उत्तीर्ण विद्यार्थी. अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थी.

**द्वितीय वर्ष बी.ए. :**

रा.तु.म. नागपूर विद्यापीठाची प्रथम वर्ष बी.ए. ही परीक्षा अथवा विद्यापीठाने मान्यता दिलेली सममान्य परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/नागपूर विद्यापीठाच्या A.T.K.T. नियमानुसार सवलत प्राप्त विद्यार्थी.

**तृतीय वर्ष बी.ए. :**

रा.तु.म. नागपूर विद्यापीठाची प्रथम व द्वितीय वर्ष बी.ए. ही परीक्षा अथवा विद्यापीठाने मान्यता दिलेली सममान्य परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार A.T.K.T. सवलत प्राप्त विद्यार्थी.

## विज्ञान शाखा

**प्रथम वर्ष विज्ञान :**

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाची १२ वी (विज्ञान) H.S.C. परीक्षा किंवा M.C.V.C. उत्तीर्ण विद्यार्थी अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थी.

**द्वितीय वर्ष विज्ञान :**

नागपूर विद्यापीठाची प्रथम वर्ष विज्ञान ही परीक्षा अथवा विद्यापीठाने मान्यता दिलेली सममान्य परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार A.T.K.T. सवलत प्राप्त विद्यार्थी.

**तृतीय वर्ष विज्ञान :**

नागपूर विद्यापीठाची प्रथम व द्वितीय वर्ष विज्ञान ही परीक्षा अथवा विद्यापीठाने मान्यता दिलेली सममान्य परीक्षा उत्तीर्ण झालेले विद्यार्थी/नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार A.T.K.T. सवलत प्राप्त विद्यार्थी.

## प्रवेशा संबंधीचे नियम

१. महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी माहिती पत्रकासह आवेदन पत्र विकत घेणे आवश्यक आहे.

२. आवेदन पत्र भरण्यापूर्वी माहिती पत्रकातील माहिती काळजीपूर्वक वाचावी आणि विद्यार्थ्याने स्वतःच्या हस्ताक्षरात सुवाच्च अक्षरात आवेदन पत्र व्यवस्थित भरावे.

३. आवेदन पत्रावर जन्मदाता / पालकाची स्वाक्षरी घेवून स्वतःच्या स्टॅम्प साईज छायाचित्राच्या (फोटोच्या) ३ प्रती आणि नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांसह प्राचार्यांनी प्रवेशासाठी नियुक्त केलेल्या समितीसमोर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

४) आवेदन पत्रात चुकीची अथवा अपुरी माहिती दिली असल्यास आवेदन पत्र स्वीकारले जाणार नाही.

५) सामान्यपणे निकाल लागल्यानंतर १५ दिवसाच्या आत आवेदनपत्र भरुन प्रवेश निश्चित करावा.

६) विद्यापीठाच्या व शासनाच्या नियमानुसार विद्यार्थ्यांना प्रवेशात आरक्षण दिले जाईल.

७) महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाशी संगणीकृत पद्धतीने जोडली जाणार असल्यामुळे माहिती पत्रकातील प्रवेश अर्ज आपल्या शाखा प्रमुखांशी अथवा प्राध्यापकांशी विचार विनिमय करुनच सदर अर्ज 'काळ्या शाईच्या बॉलपॉईंट पेननेच' भरावा. तसेच खोडतोड करु नये.

८. A.T.K.T. च्या सवलतीनुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश मिळत असेल तर E.B.C. सवलतीसाठी शासनाने घेतलेल्या शुल्कासंबंधीचा निर्णय विद्यार्थ्याला बंधनकारक राहील.

९) प्रवेशाबाबत प्रवेश समिती व प्राचार्यांचा निर्णय अंतीम राहील.

१०) प्रवेशाची शेवटची तारीख विद्यापीठाच्या निर्देशानुसार राहिल.

११) विद्यार्थ्यांनी बी.ए. भाग १ ला प्रवेश घेतांना ऐच्छिक विषयाकरिता ठरवून दिलेल्या जागांबाबत माहिती करुन घ्यावी त्यानुसार प्रवेश निश्चित करण्यात येईल.

## प्रवेशाकरीता मागासवर्गीयासाठी आरक्षित जागा

| | संवर्ग | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील बौद्ध धर्म स्वीकारलेले व्यक्ती ... ... | १३ टक्के |
| २. | अनुसूचित जमाती ... ... | ०७ टक्के |
| ३. | विमुक्त जाती (१४ तत्सम जाती) (अ) ... ... | ०३ टक्के |
| ४. | भटक्या जमाती | |
| | ब. जाने. १९९० पुर्वीच्या २८ व तत्सम जमाती ... ... | २.५ टक्के |
| | क. धनगर व तत्सम जमाती ... ... | ३.५ टक्के |
| | ड. बंजारी व तत्सम जमाती ... ... | ०२ टक्के |
| ५. | इतर मागासवर्गीय (ओ.बी.सी.) ... ... | १९ टक्के |
| ६. | विशेष मागासवर्गीय (एस.बी.सी.) ... ... | ०२ टक्के |
| | | ५२ टक्के |

टिप : आरक्षण संदर्भात शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

प्रवेश अर्जात नमूद केलेले आवश्यक कागदपत्रे/प्रवेशाच्या आवेदन पत्रासोबत जोडावयाचे दाखले

१) वर्ग १२ ची मूळ गुणपत्रिका
२) टी.सी. मूळ प्रत (दोन सत्यप्रती)
३) वर्ग १० च्या बोर्ड प्रमाणपत्राची सत्यप्रत
४) जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत
५) नॉन क्रिमीलेयर प्रत (दोन सत्यप्रती)(फक्त ओबीसीकरिता)
६) रहिवासी दाखला
७) स्वातंत्र्य सेनानी प्रमाणपत्र (असल्यास सत्यप्रत)
८) उत्पन्नाचा दाखला (वर्ष २०२३-२०२४)
९) पासपोर्ट आकाराचे फोटो (तीन)
१०) आधार कार्ड (एक सत्यप्रत)

# विविध शुल्का संबंधी माहिती

| अ.क्र. | विवरण | B.A.I | B.A.II | B.A.III | B.Sc.I | B.Sc.II | B.Sc.III |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शिक्षण शुल्क | 800 | 800 | 800 | 800 | 800 | 800 |
| २. | प्रवेश शुल्क | 19 | 19 | 19 | 19 | 19 | 19 |
| ३. | प्रयोग शाळा शुल्क | 770 | 770 | 770 | 1156 | 1156 | 1156 |
| ४. | ग्रंथालय शुल्क | 257 | 257 | 257 | 257 | 257 | 257 |
| ५. | क्रिडा/जिमखाना शुल्क | 308 | 308 | 308 | 308 | 308 | 308 |
| ६. | अभ्यासेत्तर शुल्क | 193 | 321 | 193 | 193 | 321 | 193 |
| ७. | कॉलेज मॅगझिन शुल्क | 128 | 128 | 128 | 128 | 128 | 128 |
| ८ | महाविद्या.विद्यार्थी सहाय्य निधी | 65 | 65 | 65 | 65 | 65 | 65 |
| ९. | विद्यापीठ नोंदणी शुल्क | 141 | 0 | 0 | 141 | 0 | 0 |
| १०. | विद्यापीठ विकास निधी | 161 | 161 | 161 | 161 | 161 | 161 |
| ११. | विद्यापीठ क्रीडा शुल्क | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| १२. | विद्यापीठ अश्वमेघ शुल्क | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| १३. | विद्यापीठ मेडीकल सहाय्य निधी | 96 | 96 | 96 | 96 | 96 | 96 |
| १४. | विद्यापीठ कल्याण निधी | 15 | 15 | 15 | 15 | 15 | 15 |
| १५. | विद्यापीठ विद्यार्थी बिमा शुल्क | 40 | 40 | 40 | 40 | 40 | 40 |
| १६. | ओळखपत्र शुल्क | 32 | 32 | 32 | 32 | 32 | 32 |
| | **Total** | **3089** | **3076** | **2948** | **3475** | **3462** | **3334** |

टिप-रा.तु.म. नागपुर विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारीत केलेले परीक्षा शुल्क व इतर शुल्क विद्यार्थ्यांना भरावे लागेल.

## शुल्क निधीबाबत विशेष सूचना

१. नागपूर विद्यापीठाच्या निर्देशानुसार व सुचनेनुसार विद्यार्थ्याला शुल्क निर्धारणातील बदल बंधनकारक राहील.

२. माहिती पत्रकात दिल्याप्रमाणे सर्व शुल्क प्रवेश मिळताच आवेदन पत्रासोबत ताबडतोब भरावे लागेल. प्रवेश घेतल्या नंतर काही कारणाने प्रवेश रद्द करावयाचा झाल्यास आवेदन पत्रासोबत भरलेली रक्कम परत मिळणार नाही, याशिवाय पूर्ण वर्षाची फी भरावी लागेल.

३. एकदा महाविद्यालयात प्रवेश घेतल्यानंतर शैक्षणिक वर्षाचे संपूर्ण शुल्क भरण्याची विद्यार्थ्याची जबाबदारी राहील. विद्यार्थ्याने कोणत्याही कारणाने महाविद्यालयात येणे बंद केल्यास किंवा महाविद्यालय सोडल्यास त्याला वर्षाचे संपूर्ण शुल्क भरावे लागेल. त्याशिवाय विद्यार्थ्याला कोणतेही प्रमाणपत्र मिळणार नाही.

४. जाहीर केलेल्या तारखेपर्यन्त शुल्क न भरल्यास विद्यार्थ्याचे नांव हजेरी पटावरुन काढले जावू शकेल. त्यानंतर पुन्हा प्रवेश देणे व न देणे हा प्रवेश समितीचा निर्णय राहील.

५. पुन:प्रवेश (Re-Admission) असल्यास व्यावसायिक अभ्यासक्रम झाला असल्यास, टी.सी.ची दुय्यम प्रत असल्यास त्या विद्यार्थ्याला कोणत्याही प्रकारची सवलत मिळणार नाही.

६. एका विद्याशाखेत (फॅकल्टीज) प्रवेश घेतल्यानंतर दुसऱ्या विद्याशाखेत प्रवेश घ्यावयाचा झाल्यास विद्यार्थ्याला प्रवेश व इतर शुल्क वेगळे भरावे लागेल.

७. विद्यापीठाच्या वार्षिक परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी परिक्षेचे आवेदनपत्र भरण्यापूर्वी आपले सर्व प्रकारचे देय शुल्क भरणे बंधनकारक आहे.

८. प्रयोग शाळेत विद्यार्थ्यांकडून कोणतेही उपकरण फुटल्यास किंवा हरविल्यास चालू वर्षातील मूल्याप्रमाणे त्याची किंमत भरुन द्यावी लागेल.

## शिष्यवृत्त्या व फी सवलती

महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याकरीता उपलब्ध असलेल्या प्रमुख शिष्यवृत्त्या, सवलती व पारितोषिके यांची माहीती पुढे दिलेली आहे. त्या संदर्भात पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे विद्यार्थ्यास बंधनकारक आहे.

१. अर्ज करणारा विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

२. विद्यार्थी मागील परीक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.

३. शिष्यवृत्तीचे अर्ज कार्यालयात मिळतील.

४. प्रवेश घेतल्यापासुन एक आठवड्याच्या आत सर्व कागद पत्रे कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

५. ज्या शिष्यवृत्तीमध्ये किंवा सवलतीसाठी अर्ज करायचे असेल, त्यासाठी नियमाप्रमाणे पात्र असल्याची खात्री करुन घ्यावी.

६. शासनातर्फे मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलती आणि महाविद्यालयातर्फे मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलती या बाबतीत तपशिलवार माहिती व मार्गदर्शनाकरीता महाविद्यालयाच्या शिष्यवृत्ती व सवलती विभागाची मदत घ्यावी. तसेच सुचना फलकावर वेळोवेळी प्रकाशीत केलेल्या सुचनाकडे लक्ष ठेवून पालन करावे.

७. शिष्यवृत्ती/सवलत नामंजूर झाल्यास पूर्ण शुल्क भरावे लागेल.

८. शिष्यवृत्ती/सवलत नामंजूर झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

९. शैक्षणिक सत्रात ७५% उपस्थिती असल्याशिवाय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

१०. विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर १ महिन्याच्या आत शिष्यवृत्ती, इ.बि.सी. सवलतीचा अर्ज भरणे अनिवार्य राहील.

## उपस्थितीसंबंधी नियम

१. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रत्येक विषयाच्या व्याख्यानांना व प्रात्यक्षिकांना विद्यार्थ्यांची उपस्थिती ७५ टक्के पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. त्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेला बसता येणार नाही.

२. योग्य कारणाशिवाय विद्यार्थी अनुपस्थित राहिल्यास महाविद्यालयाने ठरविल्याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.

३. नियमित किंवा सतत अनुपस्थित राहिल्यास विद्यार्थ्याचे नांव महाविद्यालयातून कमी करण्यात येईल.

## ओळखपत्र

प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याने पावती दाखवून महाविद्यालयातून ओळखपत्र घ्यावे. त्यावर स्वतःचे छायाचित्र लावून प्राचार्याची सही घ्यावी. महाविद्यालयात येतांना ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.

## नामांकन अर्ज

विद्यापीठाचे परीक्षेस प्रथम बसणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी नामांकन अर्ज भरणे आवश्यक आहे. प्रवेश निश्चित झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातून नामांकन अर्ज घेवून विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या वेळेत महाविद्यालयातील कार्यालयात सादर करावा.

## शिस्त पालनासंबंधीचे नियम

महाविद्यालयीन विद्यार्थ्याचे जीवन सर्वांगिण संपन्न होण्यासाठी महाविद्यालयीन शिस्तपालन अत्यंत महत्वाचे आहे.

१) महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांनी आवश्यकता नसतांना महाविद्यालयात प्रवेश नसणाऱ्या विद्यार्थ्यांना घेऊन महाविद्यालयीन परिसरात भटकू नये.

२) महाविद्यालयाची मालमत्ता विद्यार्थ्यांनी काळजीपूर्वक वापरावी. महाविद्यालयाच्या मालमत्तेची हेतूपुरस्सर केलेली हानी किंवा तिचा कोणताही दुरुपयोग व गैरवर्तनाबद्दल शिक्षा होईल.

३) विद्यार्थ्यांनी, गुरुजनांशी आणि कर्मचारी वर्गाशी आदराने वागावे, कुणाचाही उपमर्द करु नये.

४) विद्यार्थ्याने महाविद्यालयीन शिस्तीचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयाच्या आवारातील गैरशिस्तपणा कडक शिक्षेस पात्र ठरेल तसेच अक्षम्य गैरवर्तणूकी करीता विद्यार्थ्यास महाविद्यालयातून काढून टाकले जाईल.

५) वर्ग सुरु होण्यापूर्वी सर्व विद्यार्थ्यांनी आपआपल्या वर्गात बसणे आवश्यक आहे. वर्ग नसल्यास रिकामा वेळ त्यांनी ग्रंथालयात घालवावा.

६) महाविद्यालयाच्या पाठ्यसहवर्ती कार्यक्रमात व सर्व प्रकारच्या खेळात विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घ्यावा अशी अपेक्षा असते. त्यामुळे साहजिकच महाविद्यालयाच्या उत्सवाप्रसंगी व इतर कार्यक्रमांना सर्व विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक मानली जाते. ''ओळखपत्राशिवाय कार्यक्रमास प्रवेश मिळणार नाही, याची विद्यार्थ्याने नोंद घ्यावी.''

७) विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात येतांना ओळखपत्र सोबत आणावे.

८) महाविद्यालयाच्या परिसरात धुम्रपान, पान खाणे, गुंगी आणणारी पेय, औषधी याचा वापर करण्यास सक्त मनाई आहे.

९) विद्यार्थ्यांस महाविद्यालयीन परिसरात अथवा महाविद्यालयाच्या नावावर कुठेही राजकीय चळवळी व निदर्शने करण्यास मनाई आहे.

१०) सूचना फलकावरील प्रत्येक सूचना विद्यार्थ्याने वाचणे अनिवार्य आहे. ते न वाचल्यामुळे विद्यार्थ्याचे नुकसान झाल्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

११) महाविद्यालयाच्या परवानगीशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला कसलीही माहिती जाहीरात इत्यादी सूचना फलकावर किंवा महाविद्यालयातील परिसरात कुठेही लावता येणार नाही किंवा त्याचे वितरण करता येणार नाही.

१२) प्राचार्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही विद्यार्थ्यास कसलीही माहिती कुठेही छापता येणार नाही. तसेच संस्थेच्या अध्यक्षाकडे किंवा संचालक मंडळाकडे प्राचार्यांच्या परवानगी शिवाय तक्रार घेवून जाता येणार नाही.

१३) युनिट टेस्ट / चाचणी परिक्षा व सराव परिक्षा देणे आवश्यक आहे.

१४) बस कन्सेशन, बोनाफाईड सर्टिफिकेट व कॉलेज लिव्हींग सर्टिफिकेट साठी विद्यार्थ्यांना २ दिवस अगोदर अर्ज करावा लागेल.

१५) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये, विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेल्या अधिनियमानुसार तसेच महाराष्ट्र शासन अधिनियम क्र. ३३ अन्वये १९९९ च्या रॅगिंग बद्दलच्या कायद्यानुसार विद्यार्थी दोषी आढळल्यास त्याचेवर कायद्याच्या तरतुदीनुसार संबंधीताविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## ग्रंथालयाविषयी नियमावली

१) प्रत्येक विद्यार्थ्याला एक सभासद तिकिट (बी.टी.कार्ड) देण्यात येतील. ज्यायोगे विद्यार्थ्याला उपलब्ध ग्रंथसाठ्यातुन एक क्रमिक पुस्तक व उपलब्धतेनुसार पाठ्यपुस्तके मिळतील.

२) विद्यार्थ्याला दिलेली सभासद तिकीटे (बी.टी.कार्ड) हरविल्यास त्याची माहिती संबंधित विद्यार्थ्याने त्वरीत लेखी स्वरुपात ग्रंथपालाकडे देणे आवश्यक आहे. कारण त्यासाठी तो विद्यार्थी व्यक्तिशः जबाबदार समजला जाईल.

३) जर पुस्तकाची काही हानी झालेली असेल तर तो ग्रंथ नेण्यापूर्वी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून देणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. त्यानुसार अधिकृत नोंद करवून घ्यावी. नोंद नसल्यास ग्रंथहानीची जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील. ग्रंथपाल ठरवतील त्याप्रमाणे त्याला दंड भरावा लागेल.

४) बी.टी.कार्ड वर घरी वाचावयास ग्रंथालयातून घेतलेली पुस्तके ७ दिवसांच्या आत परत करणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या कालावधीसाठी विद्यार्थ्याला विलंब शुल्क द्यावा लागेल.

५) विद्यार्थ्यांच्या नावावर असलेला ग्रंथ गहाळ झाल्यास त्याची दुसरी नवी प्रत आणून द्यावी लागेल, जर त्याची प्रत उपलब्ध नसल्यास ग्रंथपाल जेवढी रक्कम ठरवतील तेवढी रक्कम भरपाई म्हणून द्यावी लागेल.

६) बी.टी. कार्ड शिवाय कोणत्याही विद्यार्थ्यास ग्रंथालयातून पुस्तके मिळणार नाही. तद्वतच बी.टी.कार्डची हानी झाल्यास विद्यार्थ्याकडून भरपाई केली जाईल.

७) वाचनकक्षात प्रवेश घेतांना सहाय्यक ग्रंथपालाला विद्यार्थ्याने आपले ओळखपत्र दाखविणे आवश्यक आहे. वाचनकक्षात शांतता भंग करणाऱ्या विद्यार्थ्यास वाचनकक्षाबाहेर घालविण्याचा अधिकार तेथे उपस्थित असलेल्या ग्रंथालय कर्मचाऱ्यास राहील.

८) ग्रंथालयात विद्यार्थ्यांना ड्रेस कोड, ओळखपत्र, बी.टी. कार्ड शिवाय प्रवेश मिळणार नाही.

८) प्रत्येक विद्यार्थ्याने वाचनकक्ष सोडण्यापूर्वी आपल्या जवळील पुस्तके, मासिके, नियतकालिके परत केली पाहिजेत. वाचन कक्षाबाहेर कोणतेही वाचन साहित्य नेता येणार नाही. नियम भंग दंडनीय राहील.

९) प्रवेश द्वारावरील ग्रंथालयीन कर्मचाऱ्याला ग्रंथालयाबाहेर जाणाऱ्या कोणत्याही वस्तूची पाहणी करण्याचा अधिकार राहील.

## शारीरिक शिक्षण विभाग

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता मैदानाची सुसज्ज व्यवस्था उपलब्ध असुन महाविद्यालयाद्वारे विद्यार्थ्यांना आंतर महाविद्यालयीन खेळ व क्रीडा स्पर्धांमध्ये (कबड्डी, हॉलीबॉल, बॅडमिंटन, क्रिकेट, मैदानी स्पर्धा, योगासन, ज्युडो इत्यादी) तसेच सांस्कृतीक स्पर्धा करिता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यात येते. तसेच सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना क्रेडीट मार्कस् खाली नमूद केल्या प्रमाणे देण्यात येतात.

*आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रतिनिधीत्व करणारा विद्यार्थी – १० गुण

*आंतर विद्यापीठ स्पर्धेत प्रतिनिधीत्व करणारा विद्यार्थी – १५ गुण

एकूण – २५ गुण

तद्वतच रा.तु.म. विद्यापीठाच्या आदेशान्वये विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणी घेण्यात येते व त्यावरुन आरोग्य विषयीचा अहवाल प्राप्त होतो. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता चाचणी देखील घेण्यात येते. त्याकरीता प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेच्या रेकॉर्डची नोंद करण्यात येते. शिवाय शारीरिक शिक्षण विभागाद्वारे वृक्षारोपण तथा सामाजिक हिताचे कार्यक्रम राबविले जातात.

महाविद्यालयाचे खालील खेळाडूंनी रा.तु.म. नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. त्यामध्ये

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अमर लालसिंग चव्हाण | – | कबड्डी |
| २) | कु. अपर्णा भोयर | – | कबड्डी |
| ३) | कु. अपर्णा इटकरे | – | हॉलीबॉल |
| ४) | राजेन्द्र निंबेकर | – | कबड्डी |
| ५) | कु. प्रिती सं. गवळी | – | हॉलीबॉल |
| ६) | भूषण निंघोट | – | कबड्डी |
| ७) | कु. प्रिया सं. गवळी | – | हॉलीबॉल |
| ८) | संतोष मसराम | – | हॉलीबॉल |
| ९) | महेन्द्र चव्हाण | – | कबड्डी |
| १०) | निरज भार्गव | – | कबड्डी |
| ११) | अक्षय कोडापे | – | कबड्डी |

वरील खेळाडूंचा स्मृतीचिन्हे, मोमेन्टो, ट्रॉफी तसेच ट्रॅकसूट / गेमकीट देवून गौरविण्यात आले आहे.

## शारीरिक क्षमता चाचणी –

विद्यापीठाच्या नियमानुसार महाविद्यालयात कला/विज्ञान शाखे मध्ये प्रवेश घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येते. या चाचणीसाठी प्रत्येक विद्यार्थ्याने उपस्थित राहणे आवश्यक आहे. नागपूर विद्यापीठाच्या नियमानुसार दरवर्षी जानेवारी महिन्यात शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल. याकरीता अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यास दंड आकारण्यात येईल.

शारिरीक क्षमता चाचणीत उत्तीर्ण होण्याकरीता खाली नमूद केलेल्या प्रत्येक प्रकारात एकूण ५० टक्के गुण मिळणे आवश्यक आहे. तसेच त्यांना प्रत्येक क्रीडा प्रकार पूर्ण करणे आवश्यक आहे. प्राप्त गुणानुक्रमे श्रेणी ठरविण्यात येईल.

कोणत्याही क्रीडा प्रकारामध्ये विशेष प्राविण्य मिळविण्याकरीता ९० टक्के गुण मिळविणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या निर्देशानुसार विद्यार्थ्याची शारीरिक क्षमता चाचणी घेण्यात येईल.

# महाविद्यालयीन उपक्रम तथा विविध योजना

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता महाविद्यालयात विविध उपक्रम व योजना राबविल्या जातात त्याविषयी सविस्तर तथा ठळक बाबी खालील प्रमाणे :-

## राष्ट्रीय सेवा योजना

नियमाप्रमाणे पदवी वर्गाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना किंवा शारीरिक शिक्षण यात भाग घेणे आवश्यक आहे. तेथे त्यांची ८० टक्के उपस्थिती आवश्यक आहे. उपस्थिती कमी असणाऱ्या विद्यार्थ्यांस परिक्षेस बसता येणार नाही. याशिवाय यासंबंधी विद्यापीठ व शासन यांनी ठरविलेले नियम बंधनकारक राहतील. वरील कार्यक्रमात सूट नियमानुसारच मिळू शकेल.

## विद्यार्थी परिषद

महाराष्ट्र पब्लिक विद्यापीठ कायदा - २०१६ तील तरतूदीनुसार तसेच रा.तु.म. नागपूर विद्यापीठ नागपूर यांच्या निर्देशानुसार महाविद्यालय पातळीवर विद्यार्थी परिषदेची स्थापना करण्यात येईल व त्यानुसार शैक्षणिक सत्रामध्ये विद्यार्थी परिषदेस कार्य करावे लागेल.

## सांस्कृतिक व अभ्यासेत्तर कार्यक्रम

विद्यार्थ्यांमधील सुप्त गुणांचा विकास होण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थी परिषद तथा सांस्कृतिक प्रभारी मार्फत वाद-विवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजूषा, मान्यवरांची भाषणे, काव्यवाचन, उस्फूर्त भाषण तथा गित गायन यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

## सहली

महाविद्यालय तथा विविध विभाग प्रमुखांच्या वतीने शैक्षणीक तसेच नैसर्गिक स्थळांना प्रत्यक्ष भेटी देण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकरिता सहलीचे आयोजन केले जाते. त्यासाठी पालकांची लेखी संमती आवश्यक असते. तसेच प्राचार्यांची अनुमती घेवूनच प्रभारी प्राध्यापक असतील तरच सहल नियोजित स्थळी नेली जाते. महाविद्यालयीन भूगोल विभागातर्फे प्रात्यक्षिक अभ्यासक्रमानुसार विविध ठिकाणी सहलीचे आयोजन करण्यात येते. तद्वतच नियमांचे पालन न करता विद्यार्थी व विद्यार्थीनींनी परस्पर आयोजित केलेली कोणतीही सहल अनधिकृत मानली जाईल व अशा सहलींना महाविद्यालय जबाबदार राहणार नाही.

## विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजना

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त अनुदाना नुसार विविध योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना घेता येईल. त्यासाठी त्यांना आवश्यक ते निकष पूर्ण करावे लागतील.

## विद्यापीठ प्रमाणपत्र अभ्यासक्रम

महाविद्यालयामध्ये खालील विद्यापीठ प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येतात.

1) Certificate Course in Yoga and Health.

2) Certificate Course in Basic Computer Skill.

3) Certificate Course in Skill Development in Competitive Examination.

4) Certificate Course in Cake Making.

या चार अभ्यासक्रमापैकी Yoga and Health हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम ऐच्छिक असून Basic Computer Skill हा अभ्यासक्रम बी.ए. व बीएस.सी.भाग-१, Skill Development in Competitive Examination हा अभ्यासक्रम बी.ए. व बीएस.सी. भाग-२ आणि Cake Making हा अभ्यासक्रम बी.ए. व बीएस.सी. भाग-३ करिता आवश्यक राहिल.

टिप : वरील प्रत्येक अभ्यासक्रमाची फी ३००/- रुपये राहिल.

## करिअर कट्टा

उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' युवकांच्या सर्वांगिण विकासासाठी स्थापन केला आहे. यामध्ये राज्य पातळीवरील स्पर्धा परीक्षा, पोलिस भरती, बँकिंग सेवा, स्टॉफ सिलेक्शन कमिशन, केंद्रीय पातळीवरील स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व इतर इत्यंभूत माहिती दिली जाते. त्याच बरोबर 'उद्योजक आपल्या भेटीला', 'भारतीय संविधानाचे पारायण व पर्यावरणशास्त्र अभ्यासक्रम' इत्यादींचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक विकास व रोजगार मिळविणे हे करिअर कट्ट्याचे वैशिष्ट्ये आहे.

# प्राध्यापक वृंद

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्राचार्या डॉ.कु.एस.एस. निमगरे | एम.एससी.,पीएच.डी. | प्राणीशास्त्र |
| २. | प्रा.डॉ.ए.डी. कवरासे | एम.एससी.,पीएच.डी. | वनस्पतीशास्त्र |
| ३. | प्रा.डॉ.डी.टी.स्वर्गे | एम.ए.,एम.फील.,पीएच.डी. | राज्यशास्त्र |
| ४. | प्रा.कु. के. बी.मोहोड | एम.ए.,बी.एड. | मराठी |
| ५. | प्रा.डॉ. पी.एस. ठाकरे | एम.एससी., पीएच.डी. | भौतिकशास्त्र |
| ६. | प्रा. डॉ. एन.ए. ठाकरे | एम.ए.,पी.एच.डी. | इंग्रजी |
| ७. | प्रा.एन.जी. सोनुले | एम.ए.,एम.फील. | भूगोल |
| ८. | प्रा. आर.एल. गुल्हाने | एम.एससी.,एम.फील. | रसायनशास्त्र |
| ९. | प्रा.डॉ.व्ही.आर.चिंचमलातपूरे | एम.एससी.,पीएच.डी. | भौतिकशास्त्र |
| १०. | प्रा.एस.डी. अवथरे | एम.ए.,एम.लिब.,नेट | लायब्ररी सायन्स |
| ११. | प्रा.डॉ.पी.डब्ल्यू.धनवीज | एम.ए.,एम.फिल.,नेट,पीएच.डी. | मराठी |
| १२. | प्रा.डॉ.कु.यू.डब्ल्यू. फुले | एम.एससी.,एम.फील.पीएच.डी. | प्राणिशास्त्र |

# शिक्षकेत्तर कर्मचारी

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती एन.जी. ईजापूरे | एम.ए. | वरीष्ठ लिपिक |
| २. | श्री. आर.व्ही. ढोले | एम.कॉम. | प्रयोगशाळा परिचर |
| ३. | श्री. एस. एन. गवळी | बी.एस.सी. | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ४. | श्री. एम.एस. राठोड | एस.एस.सी. | शिपाई |
| ५. | श्री. ए.जी. नेवाळे | एस.एस.सी. | चौकीदार |

महाविद्यालयीन संपूर्ण शैक्षणिक कामकाज नियोजनबद्ध पद्धतीने व्यवस्थित चालविण्याचे दृष्टीने विविध समित्यांचे गठण केलेले आहे. विद्यार्थ्यांनी संबंधीत कार्याकरिता समिती प्रमुख तथा सदस्य यांच्याशी संपर्क साधून माहीती प्राप्त करुन घ्यावी.

## महाविद्यालयीन विविध समित्या

### 1. Right to Information Act 2005 , following are the designated authorities.

1. Prof. Dr. Ku. S. S. Nimgare (Principal)- Appellate Authority
2. Prof. Dr. A. D. Kawarase - Public Information Officer
3. Smt. N. G. Ijapure - Asst. Public Information Officer

### 2. Library Advisory Committee

1. Prof. Dr. Ku. S. S. Nimgare (Principal) - President
2. Prof. S. D. Awathare (Librarian) - Secretary
3. All H.O.Ds - Members
4. College Representative - Member

### 3. Students Grievance and Redressal Cell

1. Prof. Dr. Ku. S. S. Nimgare (Principal)
2. Prof. Dr. N. A. Thakare
3. Prof. N. G. Sonule
4 Student Representative

### 4. NAAC Steering Committee

1. Prof. Dr.Ku.S.S.Nimgare (Principal)
2. Prof.Dr.N. A. Thakre (Co-ordinator)
3. Prof. R. L. Gulhane
4. Prof. Dr. P. S. Thakare
5. Prof. Dr. V. R. Chinchamalatpure
6. Prof. S. D. Awathare
7. Mr. R. V. Dhole

## 5. Student Council Formation Committee

1. Prof. Dr. P. S. Thakare 2. Prof. D.T. Swarge
3. Prof. Dr. V. R. Chinchamalatpure

## 6. Extra-Curricular and Cultural Activities

1. Prof. Dr. P. W. Dhanvij 2. Prof. Dr.U.W. Fule 3. Student Representative

## 7. Student's Information and Guidance Committee

1. Prof. S. D. Awathare 2. Prof. Dr. P. W. Dhanvij

## 8. Maitri Sangh

1. Prof. Dr. D. T. Swarge 2. Prof. Dr. V. R. Chinchamalatpure

## 9. Anti Raging Cell

1. Prof. Dr. A. D. Kawarase 2. Prof. Dr. Ku.S.S. Nimgare

## 10. Career Counselling and Placement Committee

1. Prof. Dr. A. D. Kawarase 2. Prof. Dr. P. W. Dhanvij 3. Prof. Dr.U.W. Fule

## 11. Equal opportunity cell

1. Prof. N. G. Sonule 2. Prof. Dr.U.W. Fule

## 12. Coaching and Guidance for competitive Exams

1. Prof. Ku. K. B. Mohod 2. Prof. Dr. P. W. Dhanvij

## 13. Internal Complaint Committee (I.C.C.)

| | | |
|---|---|---|
| 1. Prof. Dr.U.W. Fule | - | Presiding Officer |
| 2. Prof. Dr. P. S. Thakare | - | Member |
| 3. Prof. Dr. P. W. Dhanvij | - | Member |
| 4. Adv. Jayshri Kale | - | Member |
| 5. Smt. Nalini Ijapure | - | Member |
| 6. Mr. R. V. Dhole | - | Member |
| 7. Student Representative (F) | - | Member (B.A. III) |
| 8. Student Representative (M) | - | Member (B.Sc. III) |

## 14. Student's Welfare Officer

1. Prof. R. L. Gulhane

## 15. Research Innovation Cell

1. Prof.Dr.U.W. Fule 2. Prof.Dr.V.R.Chinchamalatpure

## 16. Entrepreneurship and Skill Development Cell

1. Prof. Dr. P. W. Dhanvij 2. Prof. Ku. U. W. Fule

## 17. Alumni Association of the College

1. Prof. Ku. K. B. Mohod 2. Prof. Dr. D. T. Swarge
3. Mr. Sagar R. Sawalakhe - Alumni Representative

## 18. Organisation of Teachers and Parents Meet

1. Prof. R. L. Gulhane 2. Prof. Dr. P. W. Dhanvij

## 19. Common Disciplinary Action Committee

1. Prof. R. L. Gulhane 2. Prof. N. G. Sonule

## 20. College Magazine Committee

1. Prof. Dr. P. W. Dhanvij - Editor 2. Prof.Dr. N. A. Thakre - Co-Editor

## 21. Internal Quality Assurance Cell (IQAC)

1. Prof. Dr. Ku. S. S. Nimgare - Chairman and Principal
2. Prof. V. S. Pare - Member (Management Representative)
3. Prof. R. L. Gulhane - Co-ordinator
4. Prof. Dr. N.A. Thakre - Member
5. Prof. Dr. P.S. Thakare - Member
6. Prof. S.D. Awathare - Member
7. Prof. Dr. P. W. Dhanvij - Member
8. Prof.Dr. V.R.Chinchamalatpure - Member
9. Prof. Dr. Ku. U. W. Fule - Member
10. Smt. N. G. Ijapure - Member (Adm. Staff)
11. Mr. Sagar R. Sawalakhe - Member (Alumini)
12. Shri. R. S. Thakare - Member (Industrialist)
13. Student Representative - Member (Student)

## 22. Women Cell

1. Prof. Ku. K. B. Mohod - President
2. Prof. Dr. Ku. U. W. Fule - Member
3. Prof. Dr. P. W. Dhanvij - Member
4. Prof. Ku. Nikita Kewate - Member
5. Smt. N. G. Ijapure - Member
6. Prof. S.D. Awathare - Member
7. Student Representative(Female) - Member (B.Sc. III)
8. Student Representative(Female) - Member (B.A. III)
9. Student Council Representative - Member

## 23. Examination Committee

1. Prof. Dr. P. S. Thakare - Incharge College Level Exam. (Regular & Winter-2024 Suppli.)
2. Prof. Dr. U.W. Fule - Incharge University Exam. (Winter-2024)
3. Prof. Dr. A.D. Kawarase - Incharge University Exam. (Summer-2025)
4. Smt. N. G. Ijapure - Clerk
5. Mr. S. N. Gawali - Clerk

## 24. NEP-2020 Implementation Cell

1. Dr. S.S. Nimgare (Principal)
2. Prof. Dr. N. A. Thakare
3. Prof. Dr. P. S. Thakare
4. Prof. R. L. Gulhane

## 25. Academic Audit Committee

1. Dr. S.S. Nimgare (Principal)
2. Prof. R. L. Gulhane
3. Prof. S.D. Awathare
4. Prof. Dr. P. W. Dhanvij

## अतिरिक्त कार्यभार प्रमुख

### सत्र २०२४-२५

१. राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) :

* कार्यक्रम अधिकारी – प्रा. कु. के. बी. मोहोड
* सहाय्यक कार्यक्रम अधिकारी – प्रा. डॉ. व्ही. आर. चिंचमलातपुरे

२. पर्यावरण शास्त्र (आवश्यक) – प्रा.डॉ.कु. यु. डब्ल्यू. फुले

३. निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार :

* महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी – प्रा. कु. के. बी. मोहोड

४. पर्यावरण क्लब अधिकारी – प्रा. एन. जी. सोनुले

५. माहितीपत्रक तयार करणे – प्रा. डॉ. व्ही. आर. चिंचमलातपुरे

६. विद्यार्थ्यांकरिता ड्रेस कोड व्यवस्था करणे – प्रा. एस.डी. अवथरे

७. ऑल इंडिया सर्व्हे ऑफ हाईअर एज्युकेशन (A.I.S.H.E.) – प्रा. डॉ. व्ही. आर. चिंचमलातपुरे

८. मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम (M.I.S.) – प्रा. डॉ. व्ही. आर. चिंचमलातपुरे

९. करिअर कट्टा – समन्वयक – प्रा. डॉ. पी.डब्ल्यु. धनविज

# प्रवेश समिती

# (Admission Committee )

## शैक्षणिक सत्र २०२४-२०२५ करिता

| अ.क्र. | नाव | पद | मोबाईल नंबर |
|---|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. डी. टी. स्वर्गे | अध्यक्ष | ९४२३६२०६४३ |
| २. | प्रा. एन. जी. सोनुले | सदस्य | ७४९९९४९८८० |
| ३. | प्रा. एस. डी. अवथरे | सदस्य | ९९२३५२२३२५ |
| ४. | प्रा. डॉ. पी. डब्ल्यु. धनविज | सदस्य | ९७६५८६४२३२ |
| ५. | श्री. एस.एन. गवळी | स. लिपिक | ७३८७७६१३५३ |

रा.तु.म. नागपूर विद्यापीठ आदेशानुसार महाविद्यालय दि. १८ जून २०२४ पासून नियमीत सुरु होईल.

## पारितोषिके

विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी तसेच त्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालया तर्फे खालील पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

१. स्व.श्री. वासुदेवराव गु. देशमुख यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री. मकरंद देशमुख यांच्याकडून महाविद्यालयातील अष्टपैलू विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

२. स्व.श्री. विनायकराव अ. ढोले यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री. राजीव वि. ढोले यांच्याकडून B.Sc. I विज्ञान विभागातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

३. स्व.श्री. धनराजजी रिधोरकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ डॉ.बी.डी. रिधोरकर यांच्याकडून B.Sc. I रसायनशास्त्र विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

४. स्व.श्री. लिलाधरजी गुल्हाने यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा. राजेश गुल्हाने यांच्याकडून B.Sc. II रसायनशास्त्र विषयामधून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

५. स्व.श्री. आनंदराव भोंडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा. बी.ए. भोंडे यांच्याकडून B.A. I अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

६. स्व.श्री. दिनेशराव इजापुरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्रीमती नलीनी इजापुरे यांच्याकडून B.A. II अर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

७. प्रा. निलेश ठाकरे यांच्याकडून B.A. I इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

८. स्व.श्री. शंकरराव रवाळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ श्री. दिलीपराव रवाळे यांच्याकडून B.A. II इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

९. प्रा.डॉ. प्रशांत वा. धनविज यांच्याकडून B.A. I मराठी वाङमय विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१०. स्व.श्री. अन्नपुर्णाबाई मोहोड यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा. के.बी. मोहोड यांच्याकडून B.A. II मराठी विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

११. प्रा. ए. डी. कवरासे यांच्याकडून B.Sc. III वनस्पतीशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१२. प्रा.डॉ. पी. एस. ठाकरे यांच्याकडून B.Sc. I भौतिकशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१३. स्व.श्री. रामकृष्णजी चिंचमलातपुरे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा.डॉ. व्ही.आर. चिंचमलातपुरे यांच्याकडून B.Sc. II भौतिकशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१४. स्व.कांताबाई वासनिक यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा.डॉ. उज्वला वा. फुले यांच्याकडून B.Sc. I प्राणिशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१५. स्व.भागीरतीबाई पाटणकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा.डॉ. सरिता एस. निमगरे यांच्याकडून B.Sc. II प्राणिशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१६. स्व.श्री. गोविंदराव सोनुले यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा. एन. जी. सोनुले यांच्याकडून B.A. I भूगोल विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१७. स्व.श्री. परशरामजी स्वर्गे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रा. डी.टी. स्वर्गे यांच्याकडून B.A. I राज्यशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१८. प्रा.डॉ.कु. सुषमा वा. बोंडे यांच्याकडून B.A. II गृहअर्थशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.

१९. प्रा. एस. डी. अवथरे यांच्याकडून उत्कृष्ट वाचक पुरस्कार रोख रु. १००१/- पारितोषिक

२०. स्व.श्री. संजय हरीप्रसाद शुक्ला यांच्या स्मृती प्रित्यर्थ जितेश संजय शुक्ला यांच्याकडून B.Sc. III रसायनशास्त्र विषयात सर्वाधिक गुण प्राप्त विद्यार्थ्यांस रोख रु. १००१/- पारितोषिक.



# विद्यापीठ गीत

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरची असा दे ।
हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ।।धृ।।

नांदोत सुखे गरिब-अमिर एकमतानी ।
मग हिंदू असो, ख्रिश्चन वा हो इस्लामी ।
''स्वातंत्र्यसुखा'' या सकलांमाजि वसू दे ।
दे वरची असा दे ।।१।।

सकळांस कळो, मानवता, राष्ट्रभावना ।
हो सर्वस्थळी मिळूनी 'समुदाय-प्रार्थना' ।
उद्योगी तरुण वीर शीलवार दिसू दे ।
दे वरची असा दे ।।२।।

हा जातीभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समुळ नष्ट हो जगातूनी ।
खळ निंदका मनीही 'सत्य न्याय' वसू दे ।
दे वरची असा दे ।।३।।

सौंदर्य रमो घरा-घरांत स्वर्गि ज्यापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ती, भिती बोहरी ।
तुकड्यास सदा सर्वदा सेवेस कसू दे ।
दे वरची असा दे ।।४।।

– राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

# ।। पसायदान ।।

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हे ।।१।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवांचें ।।२।।

दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जे वांछील तो तें लाहो । प्राणिजात ।।३।।

वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेट तु या भूतां ।।४।।

चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जें तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।

किंबहूना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिन्हीं लोकीं ।
भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ।।७।।

आणि ग्रंथोपजीवियें । विशेषीं लोकीं इयें ।
दृष्टादृष्टविजयें । होआवे जी ।।८।।

येथ म्हणेश्री विश्वेश्वराओ । हा होईल दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।।




महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय योग दिन' निमित्त
योगा प्रशिक्षणाचे आयोजन





महाविद्यालय परिसरात वृक्षारोपन करतांना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी
सोबत प्राध्यापक वृंद व विद्यार्थी





'महात्मा गांधी जयंती' निमित्त आयोजित कार्यक्रमात
आपले विचार व्यक्त करतांना मा.प्राचार्या




'महात्मा गांधी जयंती' निमित्त आयोजित कार्यक्रमात
स्वच्छता करतांना महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी





'संविधान दिन' निमित्त आयोजित कार्यक्रमात
संविधानाचे वाचन करतांना रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी




'महापरिनिर्वाण दिन' निमित्त कार्यक्रमात उपस्थित
मा. प्राचार्या, महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी




'शिवजयंती' निमित्त कार्यक्रमाचे आयोजन



गृहअर्थशास्त्र विभागातर्फे तेलाई लाकडी ऑईल मिल,
आष्टी येथील उद्योगाला भेट




गृहअर्थशास्त्र विभागा तर्फे 'मसाल्यांचे प्रदर्शन व विक्री'




'ऑगस्ट क्रांती दिन' निमित्त आयोजित 'मेरी माटी मेरा देश'
कार्यक्रमात शपथ घेतांना मा.प्राचार्या व महाविद्यालयीन प्राध्यापक



एस.आर. रंगनाथन जयंती निमित्त ग्रंथपाल दिनाचे आयोजन




महाविद्यालयामध्ये शिक्षक दिनाचे आयोजन





रा.से.यो. शिबीराचे उद्घाटन प्रसंगी आष्टी पोलिस स्टेशनचे ठाणेदार रा.से.यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन करतांना

रा.से.यो. शिबीरा अंतर्गत रक्त तपासणी शिबीराचे कार्यक्रमाचे आयोजन





सरदार वल्लभभाई पटेल जंयती निमित्त 'राष्ट्रीय एकता दिवस' कार्यक्रमाचे आयोजन

रा.से.यो. पथकाद्वारे ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे एड्सबाबत जनजागृती





'राष्ट्रीय मतदार दिन' निमित्त कार्यक्रमाचे आयोजन

'राष्ट्रीय विज्ञान दिन' निमित्त कार्यक्रमाचे आयोजन



महाविद्यालया तर्फे आप्ती परिसरात 'होम व्हिजिट' चे आयोजन




रा.से.यो. शिबीरात सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतांना रा.से.यो. स्वयंसेवक



महाविद्यालयातील सांस्कृतिक कार्यक्रमात नृत्य सादर करतांना विद्यार्थी



प्राणिशास्त्र विभागातर्फे म्युझियम स्पेशिमन प्रदर्शनीचे आयोजन



ग्रंथालय विभागातर्फे ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन




प्राणिशास्त्र विभागातर्फे सेरिकल्चर विभाग, नागपूर येथे भेट

# COLLEGE BUILDING

